मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'सरस्वती भूषण गुणगौरव' पुरस्काराने समाजसेवकांचा गौरव

## 'सरस्वती भूषण गुणगौरव पुरस्कार 2026' प्रदान; विविध क्षेत्रातील 26 मान्यवरांचा सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

ऑल स्पोर्ट्स अँड मार्शल आर्ट्स फेडरेशन ऑफ पुणे यांच्या वतीने विविध क्षेत्रातील २६ मान्यवरांना 'सरस्वती भूषण गुणगौरव पुरस्कार २०२६' देऊन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. महापौर कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात बोलताना समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी सुनील साठे, मनोज सोनावणे आदी उपस्थित होते. इरा सोनावणे यांनी महापौरांच्या कार्यावर आधारित कविता सादर केली.

मनोज साळवे, सम्यक कांबळे, जितेंद्र शिंगारे, इस्प्रित कटारिया, उर्मिला जाधव, दिपाली भादुले, डॉ. मंजुषा इंगवले, विश्वास गरजमल, युवराज कांबळे, विजय भस्मे, हेमराज थापा, सुधा ढवळे, गणेश ठोकळ, सुदेश गायकवाड, राजेंद्र कांबळे, जितू कटारिया, धर्मपाल भरणे, रोहित आढागळे, श्रीधरण थांबा, श्वेता लिमन, मयंक कांबळे, प्रतिभा भोसले, रमेश शेलार आणि पूजा भोसले यांचा सन्मान करण्यात आला.

# फुगेवाडी विषारी दारू प्रकरणात दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : आमदार शंकर जगताप

## आमदार शंकर जगताप यांची कडक भूमिका; दोषींवर कठोर कारवाईची मागणी, पोलिसांना वाढीव गस्तीचे आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील फुगेवाडी भागातील संजयनगर परिसरात गुरुवारी आणि शुक्रवारी विषारी दारूमुळे सुमारे दहा जणांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी थेट राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. या संपूर्ण अवैध धंद्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित करून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी आक्रमक मागणी जगताप यांनी केली आहे. दरम्यान पोलिसांची बैठक घेत या प्रकरणी तातडीने कडक पावले उचलावीत अशा सूचना देखील त्यांनी केल्या आहेत.



घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी तातडीने फुगेवाडी येथील संजयनगर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी मृत सचिन नेटके, अक्षय अवसरमल, विजय राठोड, राजेंद्र राठोड, अकबर पठाण, आणि बाबा शेख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या कठीण काळात शासन आणि आम्ही सर्वजण मृतांच्या नातेवाईकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. आगामी काळात या सर्व पीडित कुटुंबीयांना सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा पुरवण्यासोबतच शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या भागात कोणत्याही रुग्णाला अचानक त्रास झाल्यास त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालय किंवा 'वायसीएम' रुग्णालयात दाखल करून उपचार देण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य विभागाला दिल्या आहेत.

फुगेवाडीत घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधला. या अवैध धंद्याला चालविणाऱ्या, पाठबळ देणाऱ्या किंवा त्याकडे डोळेझाक करणाऱ्या दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या जबाबदार कर्मचाऱ्यांवर तातडीने 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी मी शासनाकडे केली आहे. केवळ दारू विक्रेतेच नव्हे, तर या रॅकेटमधील मूळ सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांना तात्काळ बेड्या ठोकल्या पाहिजेत. बाधित कुटुंबीयांना सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा आणि आवश्यक ती शासकीय मदत मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यापुढे परिसरात रात्री ११ नंतर सर्व दुकाने सक्तीने बंद ठेवण्याचे आणि पोलिसांना रात्रीच्या गस्ती वाढवण्याचे आदेश दिले आहेत. या गुन्ह्याच्या तपासात कोणतीही चालढकल किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, सर्व दोषींना शिक्षा मिळेपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही!"

### रात्री ११ नंतर दुकाने बंद ठेवा

**» या घटनेनंतर आमदार जगताप यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीला पोलीस उपायुक्त रोहिदास पवार, पोलीस उपायुक्त संदीप आटोळे, सहायक पोलिस आयुक्त विशाल हिरे , सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे, पोलीस निरीक्षक भीमराव कोळी बैठकीला उपस्थित होते परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी फुगेवाडी परिसरात रात्री ११ नंतर सर्व दुकाने व टपऱ्या सक्तीने बंद ठेवण्यात याव्यात, असे आदेश त्यांनी पोलिसांना दिले. तसेच रात्रीच्या वेळी तरुण मुले विनाकारण बाहेर फिरताना दिसल्यास पोलिसांनी तात्काळ त्यांच्या पालकांना बोलावून याविषयीची माहिती द्यावी व योग्य ती समज द्यावी, अशा कडक सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या. या गुन्ह्याच्या तपासात कोणतीही चालढकल सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.**

# पिंपरी-चिंचवड मनपाच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावरून प्रवीण जैन यांची उचलबांगडी

## सत्यवान उबाळे यांच्याकडे धुरा, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी 60 कोटींचा उपसूचना घोटाळा उघडकीस आणल्याने राज्य शासनाची मोठी कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या ६० कोटी रुपयांच्या उपसूचना घोटाळा प्रकरणात अखेर राज्य शासनाने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मानले जाणारे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांची तडकाफडकी उचलबांगडी करण्यात आली असून, त्यांच्या जागी नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य लेखा अधिकारी श्री. सत्यवान किशनराव उबाळे यांची 'वित्तीय सल्लागार तथा मुख्य लेखा अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने २९ मे २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केले आहेत.




महानगरपालिकेच्या मूळ अंदाजपत्रकात किंवा विकासकामांच्या नियोजनात ऐनवेळी कोट्यवधी रुपयांच्या उपसूचना घुसडून विशिष्ट कंत्राटदारांना आणि हितसंबंधियांना आर्थिक फायदा पोहोचवण्याचा डाव आखला गेला होता. हा संपूर्ण भ्रष्टाचार स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी अत्यंत आक्रमकपणे बाहेर काढला. स्थायी समितीचे सभापती म्हणून पदभार सांभाळत असताना, अभिषेक बारणे यांच्याकडे जेव्हा ६० कोटींच्या वाढीव निधीच्या उपसूचना मंजुरीसाठी आल्या, तेव्हा या फाईल्समधील तांत्रिक आणि आर्थिक तरतुदी संशयास्पद वाटल्याने त्यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू केली.

तपासणी दरम्यान सभापती बारणे यांनी प्रशासकीय मंजुरीचे कोणतेही ठोस निकष नसताना आणि आवश्यक आर्थिक तरतूद उपलब्ध नसतानाही या ६० कोटींच्या फाईल्स नियमबाह्य पद्धतीने मंजुरीसाठी पुढे सरकवण्यात आल्याचे उघड केले. मुख्य लेखा व वित्त अधिकारी या नात्याने प्रवीण जैन यांनी या नियमबाह्य कामाला आक्षेप घेणे अपेक्षित असताना, त्यांनी कंत्राटदारांच्या फायद्यासाठी या फाईल्स मंजूर करून घेण्यामध्ये मुख्य सूत्रधाराची भूमिका बजावली. सभापती अभिषेक बारणे यांनी हा भ्रष्टाचाराचा प्रकार केवळ स्थायी समितीतच रोखला नाही, तर या संपूर्ण प्रकरणाचे पुरावे गोळा करून राज्य सरकार आणि वित्त मंत्रालयाकडे जैन यांच्याविरोधात रीतसर तक्रार दाखल केली व त्यांच्यावर तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी लावून धरली.

सभापती अभिषेक बारणे यांनी पुराव्यांसह केलेल्या या तक्रारीनंतर मंत्रालयामार्फत या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली. महापालिकेच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा आणि शासकीय नियमांना बगल देऊन कंत्राटदारांशी संगनमत करण्याचा ठपका जैन यांच्यावर ठेवण्यात आला. महापालिकेच्या आर्थिक शिस्तीचे रक्षण करण्याऐवजी भ्रष्टाचाराला खतपाणी घातल्याचे स्पष्ट झाल्यामुळे, मुख्यमंत्री आणि वित्त मंत्रालयाने जैन यांना पदावरून हटवण्याचा कठोर निर्णय घेतला.

शासन आदेशानुसार, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेत मुख्य लेखा अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री. सत्यवान किशनराव उबाळे यांची बदली आता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'वित्तीय सल्लागार तथा मुख्य लेखा अधिकारी' या अत्यंत महत्त्वाच्या पदावर करण्यात आली आहे. ६० कोटींच्या या प्रकरणानंतर आता पिंपरी-चिंचवड पालिकेच्या आर्थिक व्यवहारांची संपूर्ण जबाबदारी उबाळे यांचेकडे असणार आहे.

शासनाने आपल्या आदेशात स्पष्ट निर्देश दिले आहेत की, बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी त्वरित रुजू व्हावे. सध्याच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदलीस पर्यायी अधिकारी यायची वाट न पाहता, स्थानिक व्यवस्था करून संबंधित अधिकाऱ्यास तात्काळ कार्यमुक्त करावे, जेणेकरून प्रशासकीय कामकाजात कोणताही अडथळा येणार नाही. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दाखवलेल्या या प्रशासकीय तत्परतेमुळे आणि राज्य शासनाच्या या धडक कारवाईमुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील कंत्राटदार आणि भ्रष्ट अधिकार्यांच्या युतीला मोठा दणका बसला आहे.

# PK चौकातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी VUP अंडरपास पुलाच्या कामाला गती

## विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या पाठपुराव्याला यश; सॉईल टेस्टिंगला सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर परिसरातील नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस मार्गावरील PK चौक येथे होत असलेल्या तीव्र वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना दररोज मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर प्रश्नाची दखल घेत माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी तत्कालीन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे या ठिकाणी VUP अंडरपास पूल उभारण्याची मागणी केली होती.



### नाना काटे यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

**» माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी PK चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न प्रशासनाकडे सातत्याने मांडला होता. त्यांनी २ जानेवारी २०२५ रोजी महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदन देत या ठिकाणी VUP अंडरपास उभारण्याची मागणी केली होती. अखेर त्यांच्या पाठपुराव्यानंतर प्रकल्पासाठी ट्रायल बीट आणि सॉईल टेस्टिंगची प्रक्रिया सुरू झाली आहे. काम वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, तसेच नागरिकांना कमीत कमी त्रास व्हावा, अशा सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**

हिंजवडी, वाकड, पुणे तसेच भोसरी, चाकण आणि खेड औद्योगिक परिसराकडे जाणाऱ्या हजारो नागरिकांची या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. परिसरातील वाढते बांधकाम प्रकल्प, वाढती वाहनसंख्या आणि अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे पिके चौकातील ट्रॅफिकची समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत होती. त्यामुळे वाहतूक कोंडीमुक्तीसाठी अंडरपास पूल अत्यावश्यक असल्याचे नाना काटे यांनी सातत्याने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.

अखेर नाना काटे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर पिके चौकातील प्रस्तावित VUP अंडरपास पुलाच्या कामासाठी आज ट्रायल बीट मारण्यात आली असून सॉईल टेस्टिंगच्या कामालाही सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बीआरटीएस स्थापत्य विभागाचे अधिकारी तसेच इन्फ्राकिंग या सल्लागार कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून संपूर्ण प्रकल्पाची माहिती नाना काटे यांनी जाणून घेतली.

संबंधित पुलाचे काम करताना नागरिकांना कमीत कमी त्रास होईल, वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यात यावे तसेच काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना नाना काटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी महानगरपालिका बीआरटीएस स्थापत्य विभागाचे उपअभियंता राहुल जव्हू, कनिष्ठ अभियंता अमोल पाचंगे, संजय नाईक तसेच इन्फ्राकिंग कंपनीचे अभियंता रणजीत कोळे, प्रवीण गुंजाळ आणि कल्पेश कोळे उपस्थित होते.

# पुण्यात सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचे आवाहन

## सारसबाग निर्णयावर राजकीय चर्चा; नागरिकांच्या सुरक्षिततेसोबत पारदर्शक भूमिकेची अपेक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

सुरक्षेच्या नावाखाली ऐतिहासिक सारसबाग दोन दिवसांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय हा केवळ प्रशासनाचा निर्णय नसून पुणेकरांमध्ये भीती आणि संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा सुनियोजित प्रयत्न असल्याचा घणाघात काँग्रेसचे महापालिकेतील गटनेते चंदूशेठ कदम यांनी केला. मंजूषा नागपुरे या पुणे शहराच्या महापौर आहेत की भाजपच्या प्रवक्त्या? असा थेट सवाल उपस्थित करत त्यांनी सत्ताधारी भाजप आणि महापालिका प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेचे कारण पुढे करून सारसबाग बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने एका विशिष्ट समाजाला आणि त्यांच्या सणाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोपही कदम यांनी केला. सोशल मीडियावर फिरणाऱ्या काही भ्रामक आणि अपप्रचार करणाऱ्या व्हिडिओंचा आधार घेत पुण्यात तणावाचे वातावरण असल्याचा खोटा आभास निर्माण केला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पोलीस उपायुक्त (विशेष शाखा) आणि महापालिका आयुक्त यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत असले तरी अधिकृत प्रसिद्धिपत्रक प्रसिद्ध होण्यापूर्वीच महापौरांनी आपल्या वैयक्तिक सोशल मीडिया खात्यावरून याची घोषणा केल्याने महापौर पदावरचे काम सांभाळत आहेत की पक्षाचे, असे कदम यांनी म्हटले आहे.

प्रशासकीय निर्णयांचे श्रेय घेण्यासाठी एवढी घाई कशासाठी? असा सवाल कदम् यांनी केला आहे. घटनात्मक पदावरील व्यक्तीने प्रशासनाच्या निर्णयाचा राजकीय फायद्यासाठी वापर करणे दुर्दैवी असल्याची टीका त्यांनी केली. सारसबाग बंद ठेवण्यामागे दुरुस्ती आणि डागडुजीचे कारण देण्यात येत होते मात्र, सोशल मीडियावर टीकेची झोड उठल्यानंतर अचानक सुरक्षेचे कारण पुढे करण्यात आले.

सारसबाग हे केवळ पर्यटनस्थळ नाही तर हजारो नागरिकांच्या विरंगुळ्याचे, व्यायामाचे आणि कुटुंबासह वेळ घालवण्याचे प्रमुख ठिकाण आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक आणि नागरिक येथे भेट देत असतात. अशा परिस्थितीत सुरक्षा व्यवस्था वाढवण्याऐवजी थेट बाग बंद करण्याचा निर्णय म्हणजे प्रशासनाने हात टेकल्याचे लक्षण असल्याची टीकाही कदम यांनी केली. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणामुळे पुणेकरांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून सत्ताधारी भाजप आणि महापालिका प्रशासनाने या निर्णयामागील नेमकी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही केली आहे.




### सामाजिक सलोखा जपण्याचे आवाहन

» सारसबाग दोन दिवस बंद ठेवण्याच्या निर्णयानंतर पुण्यात राजकीय चर्चा रंगल्या असल्या तरी शहरातील सामाजिक सलोखा कायम राखण्याची गरज व्यक्त होत आहे. पुणे हे पुरोगामी विचारांचे आणि विविधतेला सामावून घेणारे शहर म्हणून ओळखले जाते. त्यामुळे कोणत्याही निर्णयामुळे नागरिकांमध्ये गैरसमज किंवा भीती निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने सुरक्षेच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयांची स्पष्ट माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी आणि अफवांना आळा घालण्यासाठी अधिक प्रभावी संवाद साधावा, अशी मागणी पुढे येत आहे.

### सुरक्षा आणि नागरिकांचा विश्वास महत्त्वाचा

» महापालिकेच्या बोधचिन्हाचा आणि अधिकाऱ्यांच्या बनावट सह्यांचा वापर करून नागरिकांची फसवणूक होत असल्याच्या घटनांनंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर कारवाई करण्यासाठी भरती आदेशांमध्ये डिजिटल पडताळणी प्रणाली लागू केली जात आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः नोकरीच्या शोधात असलेल्या युवकांना सुरक्षित आणि अधिकृत प्रक्रियेबाबत स्पष्टता मिळणार असून, फसवणुकीच्या घटना कमी होण्यास मदत होणार आहे.

### वाढत्या शहरासाठी मनुष्यबळाची गरज

» या संपूर्ण प्रकरणानंतर पुणेकरांकडून सत्ताधारी आणि प्रशासनाने संयमित व संतुलित भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा नागरिकांच्या सुरक्षेला आणि शहरातील शांततेला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे मत पुढे येत आहे. सारसबाग हे पुणेकरांच्या भावनिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग असल्याने त्याबाबत घेतलेले निर्णय संवेदनशीलतेने मांडले जावेत, अशीही भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# “ही एक प्रकारे हत्याच, कोणाचीही गय करु नका”; मुख्यमंत्र्यांचे पोलिसांना आदेश

## पुण्यात एकाच दिवशी झालेल्या 14 जणांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणामुळे सर्वत्र खळबळ निर्माण झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील संशयास्पद मृत्यूप्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. विषारी दारुमुळे १४ जणांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. “याप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली असून, आणखी काही जणांना अटक होऊ शकते”, असे मुख्यमंत्री फडणवीस माध्यमांशी बोलताना म्हणाले. प्रकरण अतिशय संवेदनशील असून, कोणाचीही गय करु नका अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिसांना दिल्या आहेत.



पुण्यात ४८ तासांत १४ जणांचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. यात पिंपरी -चिंचवडमध्ये ९ तर पुण्यातील हडपसरमध्ये ५ जणांचा मृत्यू झाला आहे. १४ नागरिकांचे मृत्यू हे विषारी दारुमुळे झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी आज मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारण्यात आले असता त्यांनी याप्रकरणाची गंभीर दखल घेतल्याचे सांगितले. तसेच, या प्रकरणाच्या साखळीचा शोध देखील घेतला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. आठ लोकांची अटक झाल्याचे सांगतांना मुख्यमंत्र्यांनी आणखी काही जणांना अटक केले जाण्याची शक्यता व्यक्त केली.

“माझं पोलिस आयुक्तांशी बोलणं झालं आहे. कोणत्या ठिकाणी हे तयार झालं हे देखील त्यांनी शोधून काढले आहे. या प्रकरणातील संशयितांनी अटक करण्यात आली आहे. अजून काही जणांचा यात समावेश असू शकतो, त्याचाही शोध घेण्याचे काम सुरु आहे. गंभीर असलेल्यांना योग्य उपचार देऊन वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आठ लोकांना अटक झाली असून, आणखी काही जणांना अटक होऊ शकते”, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### ‘मिथेनॉल’सारखा पदार्थ मिक्स केल्याचा संशय

» “दोषींवर कडक कारवाई केली जाईल. ही एक प्रकारे हत्याच असून, अतिशय गंभीर कलमं देखील त्यांच्यावर लावण्यात आली आहेत”, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. विषारी मद्यामध्ये मिथेनॉससारखा पदार्थ मिक्स केल्याबाबत प्रश्न विचारला असता, “मिथेनॉल सारखाच पदार्थ आहे, पोलिस यावर अधिक माहिती देतील”, असेही मुख्यमंत्र्यांनी पुढे स्पष्ट केले.

# भामा-आसखेडचे पाणी पिवळसर का येतंय? महापालिकेने अखेर केला मोठा खुलासा

## धानोरी, टिंगरेनगर, विश्रांतवाडी, येरवडा आणि वडगाव शेरी भागात पिवळसर पाण्याचा पुरवठा; पालिकेचा पाणी पिण्यायोग्य असल्याचा दावा.

**पुणे | प्रतिनिधी**

धानोरी, टिंगरेनगर, विश्रांतवाडी, येरवडा, वडगाव शेरी आणि नगर रोड परिसरांत गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पिवळसर पाणी येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने पाहणी करून हे पाणी पिण्यायोग्य असल्याचा दावा केला आहे. दरम्यान, ज्या भागात गढूळ पाणी येत आहे, त्या भागात गुरववारी अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर या पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसह पहाणी करणार आहेत.

तसेच ज्या भागात गढूळ पाणी येत आहे त्या ठिकाणच्या जलवाहिन्यांचीही तपासणी केली जाणार आहे. या भागांना भामा आसखेड धरणातून येणारे पाणी कुरुळी येथील पालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया करून वितरित केले जाते. पालिकेच्या माहितीनुसार, ११ तारखेपासून झालेल्या पावसानंतर धरणातून येणाऱ्या अशुद्ध पाण्याचा रंग वाढलेला आहे.

यापूर्वी अशुद्ध पाण्याचा रंग ५ ते १० हॅझन युनिट इतका होता. तो टप्प्याटप्प्याने वाढून ३० ते ४० हॅझनपर्यंत पोहोचल्याचे निरीक्षण आहे. धरणाची पाणीपातळी कमी होणे, पावसाळी वातावरण आणि शेवाळ वाढणे यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याची शक्यता आहे. परिणामी धरणातून येणाऱ्या पाण्याचा पिवळसरपणा वाढल्याचे दिसते. जलशुद्धीकरण केंद्रामध्ये प्रक्रिया केल्यानंतरही पिवळसरपणा कमी होण्यास वेळ लागतो.

सामान्यतः शुद्ध पाण्याचा रंग ४ ते ५ हॅझन असतो. मात्र, सध्या तो १० ते १५ हॅझनपर्यंत आहे. त्यावर उपाययोजना म्हणून ॲलम (तुरटी) डोझिंगचे प्रमाण वाढविले असून पिवळसरपणा कमी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू आहे. सध्या पाण्यातील पिवळसरपणा १० हॅझनपर्यंत कमी झाला आहे.

मात्र, भामा आसखेड (कुरुळी) जलशुद्धीकरण केंद्र ते वितरण व्यवस्थेतील जलटाक्या यामधील मोठे अंतर असल्याने पूर्वी पुरवठा झालेल्या अधिक रंगाच्या पाण्याचे अवशेष तेथे शिल्लक असण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणी पूर्ववत होण्यासाठी तीन ते चार दिवसांचा कालावधी लागेल, असेही स्पष्ट करण्यात आले.



### तीन ते चार दिवसांत परिस्थिती पूर्ववत

**» पाणी शुद्धीकरणासाठी तुरटीचे डोझिंग वाढवण्यात आले असून पिवळसरपणा १० हॅझनपर्यंत कमी करण्यात यश आल्याचे पालिकेने सांगितले. मात्र, कुरुळी जलशुद्धीकरण केंद्रापासून वितरण टाक्यांपर्यंतचे अंतर मोठे असल्याने जुन्या पाण्याचे अवशेष अजूनही पाइपलाइनमध्ये असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे पाणी पूर्णपणे स्वच्छ होण्यासाठी तीन ते चार दिवसांचा कालावधी लागू शकतो. दरम्यान, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेऊन नियमित नमुने तपासले जात असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली.**

### पाण्याच्या रंगाबाबत पालिकेची पाहणी

**» भामा आसखेड धरणातून येणाऱ्या पाण्याचा रंग पावसानंतर बदलल्याने धानोरी, टिंगरेनगर, विश्रांतवाडी, येरवडा, वडगाव शेरी आणि नगर रोड परिसरातील नागरिकांनी पिवळसर पाण्याबाबत तक्रारी केल्या आहेत. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने पाहणी करून हे पाणी पिण्यास योग्य असल्याचा दावा केला आहे. अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर गुरुवारी संबंधित भागांची पाहणी करणार असून जलवाहिन्यांची तपासणीही केली जाणार आहे. पाण्याचा रंग पूर्ववत करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्रात विशेष उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.**

### धरणातील बदलांमुळे पाण्यावर परिणाम

**» पालिकेच्या माहितीनुसार, ११ तारखेपासून झालेल्या पावसानंतर धरणातील पाण्याचा रंग वाढू लागला. पूर्वी ५ ते १० हॅझन युनिट असलेला रंग आता ३० ते ४० हॅझनपर्यंत पोहोचला होता. धरणातील पाणीपातळी कमी होणे, शेवाळ वाढणे आणि पावसाळी वातावरण यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. शुद्धीकरणानंतरही पिवळसरपणा पूर्णपणे कमी होण्यासाठी वेळ लागत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. नागरिकांनी घाबरून न जाता पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.**

---

# पुण्यात रात्री 10 नंतर खाऊ गल्ल्या बंद; विद्यार्थ्यांकडून नाराजी

## पोलिसांच्या आदेशामुळे रहिवाशांना दिलासा, मात्र कमी बजेटमधील जेवणाचा आधार बंद झाल्याने विद्यार्थी आणि प्रवासी अडचणीत

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पुणे शहर पोलिस आयुक्तांनी रात्री 10 नंतर खाऊ गल्ल्या बंद करण्याचे आदेश दिल्याने शहरात त्याचे उलट सुलट पडसाद उमटू लागले आहेत. या आदेशाच्या अंमलबजावणीने रात्रीच्या वेळी शहरातील फुटपाथवर होणारी गर्दी कमी झाली असून रहिवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. तर रास्त दरात खाद्यपदार्थ पुरविणाऱ्या खाऊ गल्ल्या बंद झाल्याने विद्यार्थी व परगावहून येणाऱ्या प्रवाशांची मात्र मोठी गैरसोय झाली आहे.

खाऊ गल्ल्या, खाद्यपदार्थ मिळण्याची ठिकाणे बंद झाली असली, तरी अनेक तरुण- तरुणी आणि नागरिक नेहमीप्रमाणे रात्री उशिरापर्यंत येथे खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी येत होते. मात्र, हे अड्डे बंद असल्याने नाइलाजाने त्यांना उपाशी पोटी परतावे लागले. या संदर्भात काही विक्रेत्यांशी संवाद साधला असता, पोलिसांनी सुरक्षेच्या कारणास्तव रात्री 10 वाजता दुकाने बंद करण्याचे आदेश दिले आहेत, त्यामुळे आम्हाला व्यवसाय बंद करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरात त्याचे उलट सुलट पडसाद उमटू लागले आहेत. या आदेशाच्या अंमलबजावणीने रात्रीच्या वेळी शहरातील फुटपाथवर होणारी गर्दी कमी झाली असून रहिवाशांनी सुटकेचा निःस्वास सोडला आहे. तर रास्त दरात खाद्यपदार्थ पुरविणाऱ्या खाऊ गल्ल्या बंद झाल्याने विद्यार्थी व परगावहून येणाऱ्या प्रवाशांची मात्र मोठी गैरसोय झाली आहे.

बुधवारी रात्री शहरातील नळ स्टॉप, डेक्कन आणि विविध परिसरात फिरून प्रत्यक्ष पाहणी केली असता, पोलिसांकडून रात्री 10 वाजताच डेक्कन झेड बिजखालील आणि बिजवरील तसेच नळ स्टॉप परिसरातील खाऊ गल्ल्या बंद केल्याचे दिसून आले. मात्र, त्याच वेळी डीपी रोड, म्हात्रे पूल परिसर, मध्यवस्तीतील मोठे हॉटेल्स सुरूच असल्याचे दिसले.



### विद्यार्थ्यांकडून नाराजी

**» एकीकडे सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांचे हक्काचे ठिकाण असलेल्या खाऊ गल्ल्या 10 वाजता बंद झाल्या असताना, दुसरीकडे शहरातील मोठमोठी हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स मात्र रात्री 10 नंतरही थाटात सुरू असल्याचे पाहायला मिळाले. पोलिसांच्या या दुटप्पी भूमिकेमुळे रात्री 10 नंतरची बंदी फक्त खाऊ गल्ल्यांनाच की बड्या हॉटेल्सनासुद्धा आहे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**